पाक्षिक | शेतकरी संघटक | वर्ष १० वे
वार्षिक वर्गणी रु. ३० | | अंक २१ वा
किंमत १ रुपया २५ पैसे | | २१ फेब्रुवारी १९९४

# गुन्हेगार सरकार, गुंड पोलिस

## — शरद जोशी

महाराष्ट्रातील कापूस शेतकरी आपल्या मालाला भाव मिळावा म्हणून कित्येक वर्षे झगडत आहे. वर्षानुवर्षे तो सरकारशी लढत होता. गोऱ्या इंग्रजांच्या सत्तेशी, काळ्या इंग्रजांच्या सरकारशी, गिरणी मालकांशी, पुढाऱ्यांशी. आता बदल एवढाच की कापूस शेतकऱ्याचा संघर्ष आता गुन्हेगारांशी आणि गुंडांशी होत आहे.

**कापसातून वाहणारे रक्त**

तसे सगळ्याच शेतीमालाचे शोषण होते, पण कापसाचे शोषण विशेष क्रूर. मनुष्याच्या पोटाची सोय लागली की त्यानंतरची त्याची सर्वात मोठी गरज अंगभर वस्त्राची. साहजिकच पहिली कारखानदारी उभी राहिली ती कापड गिरण्यांची आणि सर्वात जास्त शोषण झाले ते कापसाच्या पिकाचे आणि कापूस पिकवणाऱ्या शेतकऱ्याचे.

इंग्रजांच्या हिंदुस्थानवरील साम्राज्याचे मूळ उद्दिष्ट कापसाच्या शोषणाचे होते. गांधीजींनी त्याविरुद्ध लढा उभा केला तो चरख्याची निशाणी घेऊन आणि खादीचा कार्यक्रम घेऊन. या एकाच गोष्टीत सगळे कापसाचे राजकारण आणि तत्त्वज्ञान सामावलेले आहे.

गोरा इंग्रज गेला पण त्याजागी काळा इंग्रज आला. शेतकऱ्याचे शोषण चालूच राहिले. याचा सगळ्यात मोठा पुरावा आता अगदी आकडेवारीने उपलब्ध आहे. १९८६ ते ८९ या काळात सरकारने सगळ्या शेतकऱ्यांना किमान ४७ टक्क्याची उलटी पट्टी दिली. कापूस-शेतकऱ्याची उलटी पट्टी तर २०६ टक्क्याची. म्हणजे माल विकून शेतकऱ्याला १०० रुपये मिळाले असतील तर प्रत्यक्षात त्याला ३०६ रुपये मिळायला पाहिजे होते.

कापसाचा भाव बुडवण्यासाठी सरकारने काय काय केले नाही? गिरणी मालकांमार्फत दरवर्षी कापसाचे पीक बुडल्याची, पीक अपुरे असल्याची आवई उठवली. निर्यातीवर जवळजवळ कायम बंदी ठेवली. जरा काही शेतकऱ्यांना बरा भाव मिळेल असे दिसले की, बाहेरून कापसाची आयात करण्याची तत्परतेने व्यवस्था करून शेतकऱ्यांच्या तोंडचा घास पळवला. हे सगळे करताना गिरणी मालकांच्या या सेवकांनी आपण हातमागधारकांचे आणि विणकरांचे हितरक्षण करतो आहोत असा आव आणला. हातमागधारकांची एकूण सगळी गरजच मुळी ४ लाख गाठींची त्यांना कापूस स्वस्त मिळावा याकरिता कितीतरी अधिक सुटसुटीत आणि सोपी व्यवस्था करता आली असती. पण विणकरांची ४ लाख गाठी रुई स्वस्त व्हावी म्हणून १०० लाख गाठींचा बाजार शासनाने वर्षानुवर्षे उध्वस्त केला. जखमांमधून वाहणारे रक्त थांबावे म्हणून कापूस लावला जातो. पण शेतीच्या कापसातून वर्षानुवर्षे रक्त वाहात राहिले आहे.

**मराठी कापसाची करूण कहाणी**

महाराष्ट्र कापूस पिकवणाऱ्या राज्यांतील एक महत्त्वाचे राज्य. देशातील एकूण उत्पादनापैकी २० टक्के कापूस महाराष्ट्रात आजही पिकतो. पंजाब, महाराष्ट्रात जसजशी आणि जेथे जेथे पाण्याची सोय होत गेली तसतशी तेथे तेथे कापसाची पीछेहाट झाली आणि शेतकरी दुसऱ्या पिकांकडे वळले. विदर्भ आणि मराठवाडा प्रदेशात जेथे काही पर्याय शेतकऱ्यांपुढे नव्हता तेथे कापसाचे उत्पादन आजही चालू आहे. या प्रदेशातील कापसाची बहुतेक शेती कोरडवाहू. त्यामुळे सर्वसाधारणपणे दर एकरी येणारे पीक एक क्विंटल कापसाचे. हरियाणा, पंजाब येथील बागायती कापसाचे पीक सरासरीने देखील ५ क्विंटलच्या वर; आठदहा क्विंटल कापूस दर एकरी घेणारे शेतकरी गांवोगावी सापडतात.

महाराष्ट्रातल्या कापूसशेतकऱ्यांच्या समस्या सोडवण्यासाठी समाजवादाच्या चलतीच्या काळांत एकाधिकार खरेदी व्यवस्था सुरू करण्यात आली. नाव सहकाराचे, राज्य सरकारचे आणि काम स्वाहाकाराचे. अशी ही सगळी व्यवस्था. कापसाच्या खरेदीचा हंगाम चार महिन्याचा. एकाधिकाराचा नोकरवर्ग वर्षभराचा आणि कायम. ज्या त्या पुढाऱ्याला खूष करण्यासाठी त्याच्या माणसांना नोकरीत भरती

**साखर साम्राज्यात धरणीकंप**

ज्या शेतकऱ्यांना या कार्यक्रमात सामील व्हायचे असेल त्यांनी निदान १००० रुपये खर्च करण्याची तयारी ठेवली पाहिजे. कोर्टातील या लढ्यात भाग घेण्याची ज्यांची इच्छा असेल त्या शेतकऱ्यांनी शेतकरी संघटनेच्या मध्यवर्ती कार्यालयाकडे 'शेतकरी संघटना' या नांवाने काढलेल्या एक हजार रुपयांच्या ड्राफ्टसकट आपले नाव पत्त्यासह कळवावे.

सविस्तर लेख पान ४ वर

करणे अपरिहार्य. एकदा अधिकारी लोक नेमले की त्यांचे पगार आले, प्रवास आले, भत्ते आले, मेजवान्या आल्या, गाड्या आल्या, पंचतारांकित हॉटेलातील ओल्या पार्ट्या आल्या; पुढाऱ्यांचे नियंत्रण म्हणजे पुढाऱ्यांच्या भुका आल्या, त्यांचे टेलीफोन आले, प्रवास आला, कमिशन आले, सगळे काही आले.

एकाधिकाराची थोडक्यात अवस्था काय? कापूसखरेदीच्या व्यवस्थेचा खर्च वारेमाप. रुई काढण्यात नासधूस अफाट आणि देशातील २० टक्के कापसावर नियंत्रण असूनदेखील रुईचा सगळ्यात पडता भाव मिळणार तो एकाधिकाराला. अधिकाऱ्यांच्या आणि पुढाऱ्यांच्या बोटांत हिऱ्यांच्या अंगठ्या आणि कापूस शेतकरीमात्र विजेचे बिल भरता येत नाही म्हणून विष खाऊन जीव देण्याच्या संकटात. एकाधिकाराने फायदा झाला तो मुंबईच्या गिरणीमालकांचा. कापसाच्या भावातील चढउतारीवरच त्यांचा सगळा फायदा अवलंबून.

पूर्वी ३ ते ६ महिन्याचा कापूस गिरणीमालक खरेदी करून ठेवत, निदान वायदे बाजारात हक्क राखून ठेवत. कच्च्या मालाच्या साठवणुकीच्या खर्चाचा सारा आर्थिक बोजा एकाधिकार व्यवस्थेमुळे गिरणीमालकांच्या खांद्यावरून उठून कापूस शेतकऱ्यांच्या उरावर येऊन पडला. गिरणी मालकांच्या सोयीसोयीने दर आठ दिवसांनी लिलाव करून रुई पिकण्याची पद्धत एकाधिकाराने सुरू केली आणि गिरणीमालकांचे नशिब फळफळले.

एकाधिकाराच्या जनकांच्या मनात, आजपर्यंत ती व्यवस्था चालवणाऱ्यांच्या मनात हेतू समाजवादी व्यवस्थेचा होता की कामगारांच्या कल्याणाचा होता कसे सांगावे! कोणाच्या मनातले कसे काय ओळखता येईल? पण एकाधिकाराचा परिणाम गिरणीमालकाचे भले, नोकरदारांचे कल्याण आणि शेतकऱ्यांचे वाटोळे हा झाला यात कणमात्र शंका नाही.

## शेतकऱ्यांचा लढा

समाजवादाचा आणि नियोजनाचा बोलबाला असलेल्या नेहरू कालखंडात शेतकऱ्यांनी सरकारच्या जुलमाविरुद्ध लढा दिला. व्यवस्था आणि परिवर्तन यांचे प्रश्न निर्माण न करता शेतकऱ्यांनी एक साधी सोपी मागणी केली. व्यवस्था सहकाराची असो, व्यापाऱ्याची असो, परमेश्वराची असो, सैतानाची असो; आमच्या मालाला उत्पादन-खर्चावर आधारित भाव मिळणे हे महत्त्वाचे आहे. बाजार खुला असता, शेतकऱ्यांना उलटी पट्टी मिळण्याची कडेकोट व्यवस्था सरकारने केली नसती तर शेतकऱ्यांना सरासरीने मिळणारा भाव उत्पादन खर्चाइतका असता, तेवढा आम्हाला मिळू द्या अशी ही साधी मागणी. या मागणीने वेगळी वेगळी रूपे घेतली. महाराष्ट्रातील हमीभाव देशभरच्या आधारभूत किंमतीपेक्षा निदान २० टक्के जास्त असला पाहिजे, भांडवली खर्च निधी, किंमत चढउतार निधी अशा गोंडस सबबींखाली होणाऱ्या कपाती बंद झाल्या पाहिजेत. अशा भूमिकांतून कापूस शेतकऱ्यांनी सतत प्रदीर्घ लढे दिले. व्यवस्था, तिचे परिवर्तन, समाजवाद, नियोजन, खुली व्यवस्था असल्या शाब्दिक जडजंबालामुळे गोंधळून जाणाऱ्या शेतकऱ्याना आपल्या घामाचे दाम मिळाले पाहिजे ही गोष्ट सहज समजली आणि ते लढ्यात उतरले.

नेहरूवादी व्यवस्था आणि शेतीमालाला रास्त भाव यांचे नाते साप-मुंगसाचे आहे. शेतीमालाला रास्त भाव दिला तर समाजवादी तोंडवळ्याची कोणतीही व्यवस्था एक दिवसही जगू शकत नाही हे हळूहळू शेतकऱ्यांना स्पष्ट होत गेले. कारखानदारांना ते पहिल्यापासून माहीत होते. पुढाऱ्यांनाच काय ते शेतकऱ्यांच्या मागणीतील गूढ इंगित उमगले नव्हते.

## खुल्या व्यवस्थेतही कापसाची विटंबना

कुणाला समजो ना समजो, अग्नी आपले जाळण्याचे काम केल्याखेरीज राहत नाही. शेतकरी आंदोलनाने नेहरूव्यवस्थेचा पायाच उखडला. ती व्यवस्था संपुष्टात आली. खुल्या व्यवस्थेचे गुणगान चालू झाले. सर्व हयातभर नेहरूव्यवस्थेची हुजरेगिरी करणारे डॉ. मनमोहन सिंग एका दिवसात खुल्या व्यवस्थेचे भीष्माचार्य ठरले. सरकारी सहकार आणि समाजवाद यांच्या गुढ्या वर्षानुवर्षे वाहिलेले शरद पवार खुल्या व्यवस्थेचे सर्वात मोठे समर्थक आपणच आहोत अशी शेखी मिरवू लागले. नेहरूव्यवस्थेपेक्षासुद्धा खुल्या व्यवस्थेत भूखंडांच्या अफरातफरीत आपल्या खिशात अधिक पैसे पडावेत अशा तयारीला अनेक पुढारी लागलेत.

खुल्या व्यवस्थेचे गुणगान तोंडी, पण शेतकऱ्यांसाठी मात्र कापसाची एकाधिकार व्यवस्थाच चालू. डंकेल प्रस्तावांवर सही, पण प्रत्यक्षात कापूस निर्यातीवर बेगुमान बंदी, असले अर्थकारण सुरू झाले. १९९३-९४ चे वर्ष म्हणजे महाराष्ट्रातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांवरील अन्यायाचा कळस. देशातील कापसाचे एकूण उत्पादन फारसे चांगले नाही. पण महाराष्ट्रात मात्र यंदा कापसाचे भरघोस पीक आले. जेथे १ क्विंटल कापूस यायचा नाही, तेथे चारपाच क्विंटलपर्यंत पीक आहे. हंगामाच्या सुरुवातीपासून देशभर भाव चढे राहिले. १४०० रुपये क्विंटल म्हणता म्हणता गेल्या आठवड्यात एच्-४ कापसाचे भाव २००० रुपये प्रती क्विंटल पर्यंत कडाडले. अनेक वर्षांचे कर्जाचे ओझे उतरण्याची आशा शेतकऱ्यांच्या मनांत पालवली होती.

कापसाच्या उत्पादनाचा ताळेबंद पाहिला तर यंदा १० ते २० लाख गाठी कापसाची निर्यात करता येईल अशी अपेक्षा होती. सरकारी हिमटेपणाने ५ लाख गाठींच्या निर्यातीचा कोटा सुटला. अजून निदान ५ लाख गाठींच्या निर्यातीची परवानगी मिळेल अशी अपेक्षा होती. पण प्रत्यक्षात घडले उलटे. चांगला भाव मिळेपर्यंत शेतकऱ्याने माल राखून ठेवण्याचा प्रयत्न करावा यात गैर ते काय आहे? पण यालाच सरकार 'साठेबाजी' म्हणते. साठेबाजीमुळे कापसाचे भाव भडकत आहेत असा कांगावा करते. विणकरांच्या नांवाने डोळ्यातून नक्राश्रू वहाववते आणि साठेबाज शेतकऱ्यांना धडा शिकवण्याकरिता सरकार सारी न्यायबुद्धी, सद्सद्विवेक, आंतरराष्ट्रीय कायदेकानून झुगारून लावते.

## सरकारच गुन्हेगार

सरकारने कापसाच्या निर्यातीवर तातडीने बंदी घातली. जाहीर केलेल्या ५ लाख गाठींच्या कोट्यांपैकी १ लाख २० हजार गाठींचे करार अजून व्हायचे होते; अशा गाठींचा कोटा रद्द करण्यात आला. एवढ्यावर सरकार थांबले नाही. आपली विक्राळ नखे त्याने चारच दिवसात बाहेर काढली. १ लाख ५० हजार गाठींचे निर्यातीचे करार झालेले होते. पण माल अजून जहाजावर चढला नव्हता. या गाठींचाही निर्यातपरवाना रद्द झाल्याचे सरकारने जाहीर

केले. एवढेच नव्हे तर, चांगल्या पिकाच्या या वर्षी ५ लाख गाठी आयात करण्याची तयारी चालवली.

अर्थकारण सोडा, न्याय अन्याय सोडा, सरकारची ही कृती बेकायदेशीर आहे. एवढेच नव्हे तर गुन्हेगारी आहे. डंकेल करारातील तरतुदींप्रमाणे सरकारला अशी निर्यातबंदी करता येत नाही. गॅट संघटनेतील अधिकाऱ्यांशी या विषयावर संपर्क साधला. निर्यातबंदी ही गॅट कराराचा भंग करणारी आहे हे त्यांनी मान्य केले. पण त्याबद्दलची तक्रार शेतकरी संघटनेने किंवा इतर दुसऱ्या कोणत्याही खाजगी संघटनेने किंवा व्यक्तींनी करून चालणार नाही. गॅट करारावर सह्या करणाऱ्या देशांपैकी कोण्या एका देशाच्या शासनाने हिंदुस्थान सरकारविरुद्ध तक्रार नोंदवली पाहिजे. अशी तक्रार नोंदवली गेली तर गॅट आवश्यक ती कारवाई करेल, असे सांगण्यात आले. कापसाची निर्यातबंदी ही गॅट कराराच्या १९ व्या कलमान्वये बेकायदेशीर आहे हे स्पष्ट आहे. पण अजून योग्य तो FIR दाखल झाला नाही म्हणून सरकारच्या हाती बेड्या पडलेल्या नाहीत. पण गॅट कराराच्या भंगाबद्दल सरकारवर कारवाई होण्याबद्दल तांत्रिक त्रुटी आहेत, म्हणून काही सरकार अगदी मोकळे सुटणार आहे असे नाही. कापसाच्या व्यवहारातील काही युरोपीय आणि जपानी कंपन्यांनी सराकारच्या या निर्यातबंदीमुळे हिंदुस्थानचे नांव 'काळ्या यादीत' घालण्याची धमकी दिली आहे. एवढेच नव्हे तर, नुकसान-भरपाई दाखल ४० कोटी रुपयांचा दावा दाखल केला आहे. या दाव्यामुळें सर्वाधिक नुकसान महाराष्ट्रातील एकाधिकार व्यवस्थेचे होणार आहे. युरोप आणि जपानमधील कापूस व्यापाऱ्यांच्या प्रतिनिधींची एक बैठक या प्रश्नाची चर्चा करण्याकरिता भरणार आहे. त्यांचे एक प्रतिनिधी मंडळ देशाला भेट देण्याकरिता येण्याचीही शक्यता आहे. जिनिव्हा येथील कापूस व्यापारी संघटनेने अध्यक्ष श्री. ॲल्र्ट गेहरेल यांनी वस्त्रोद्योग मंत्रालयाला आपली नाराजी आधीच कळवलेली आहे. अशा निर्णयामुळे भारताची विश्वसनीयता संपुष्टात येईल अशी जाणीव त्यांनी वस्त्रोद्योग मंत्रालयाला दिली आहे.

थोडक्यात, महाराष्ट्रातील कापसाचा एकाधिकार म्हणजे खुल्या व्यवस्थेचे गुणगान करण्याऱ्या केंद्र शासनाची शेतकरीविरोधी खुनशी कारवाई आहे, तर कापसाच्या निर्यातीवरील बंदी हे सरळ सरळ आंतरराष्ट्रीय गुन्हेगारीचे कृत्य आहे.

या सरकारी गुन्हेगारीविरुद्ध विदर्भातील शेतकरी निर्धाराने उठला आहे. सरकारी कापसाची खरेदी खुशाल चालू द्या. त्यात एकाधिकाराची मक्तेदारी नको, आम्ही आमचा शेतीमाल आमच्या मर्जीप्रमाणे विकू अशा घोषणा देऊन कापूस शेजारच्या राज्यात घेऊन जात आहे.

### पोलिस — गणवेषातील गुंड

गुन्हेगारी शासनाच्या विरुद्धच्या या आंदोलनाने पोलिसांचे डोके भडकण्याचे काय कारण? शेतकरी काही चोरीमारी करत नाहीत. देशातल्या देशात एका राज्यात माल विकण्याऐवजी चांगला भाव मिळावा म्हणून सरहद्द ओलांडून शेजारच्या राज्यात कापूस विकतात यात असे भयानक कृत्य काय आहे?

मुंबईमधील बॉंब स्फोटांसाठी कोकणपट्टीत दारूगोळा उतरवण्यात आला. त्या दारूगोळ्याची वाहतूक सुरक्षित व्हावी याचा चोख बंदोबस्त करणारे पोलिस अधिकारी, मुंबईतील दादांकडून नियमित मलीदा घेऊन त्यांच्या सगळ्या भयानक गुन्हेगारी आणि देशद्रोही कृत्यावर पांघरूण घालणारे पोलिस अधिकारी, कापूस या राज्यातून त्या राज्यात गेला तर माथेफिरूसारखे कां वागतात? प्रतिष्ठित, सन्मान्य नागरिकांवर किरकोळ चोरीचा आरोप घालून त्यांना दंडबेड्या घालून फिरवतात. एवढे पोलिस बेताल का होतात? अकोल्यात कापसाचा बाजार भरवला तर शिपायांच्या तुकड्यांचा ताफाचा ताफा उतरवून शेतकरी कार्यकर्त्यांना जागोजाग अटक करतात, आंदोलनातील कार्यकर्त्यांना खुलेआम लाथाबुक्क्यांनी तुडवतात, कापूस परराज्यात घेऊन जाणाऱ्या गाड्यांवर खाजगी गोळीबार करतात, पोलिस अधिकाऱ्यांचे डोके ठिकाणावर कां नाही? मुख्यमंत्र्यांपर्यंत हप्ते पोचवून त्यांनी सरहद्दीवरच्या बदल्या मिळवल्या असतीलही. सरहद्दीवरची जागा मिळाली, आता प्रत्येक कापसाच्या गाडीमागे हजारो रुपये गोळा करून गडगंज पैसा जमा करण्याची स्वप्ने त्यांनी पाहिलीही असतील. पण ती स्वप्ने कोठेतरी दुखावतात म्हणून शेतकऱ्यांवर हातापायी आणि गोळीबार करण्याची हिंमत त्यांना होतेच कशी?

गुन्हेगार सरकार आणि त्यांच्या बेकायदेशीर कृतींची अंमलबजावणी करणारे गुंड पोलिस, आपण गणवेषात आहोत तोपर्यंत आपल्याला काही धास्ती नाही अशा थाटांत मिरवत आहेत. कापसू शेतकरी म्हणजे सर्वात शोषित शेतकरी, शेतकऱ्याच्या शोषणाविरुद्धच्या लढ्यातल्या शेवटच्या चरणात त्याच्यावर एक जबाबदारी येऊन पडली आहे. कापूस शेतकऱ्यांना लुटणे आंतरराष्ट्रीय करारांच्या विरुद्ध आहे. पण ते कायदे धाब्यावर ठेवून सरकार शेतकऱ्यांविरुद्ध उठले आहे. सरकारी गुन्हेगारीचा पाठपुरावा करण्यासाठी सरसावले आहेत. पोलिसी गुंड गणवेषात आले तरी पोलिस होत नाहीत. गणवेश घालणारे चोर गुंडच राहतात हे कापूस शेतकऱ्यांनी कृतीने दाखवून देणे जरूर आहे.

●●●

## गॅट आणि आयात उदाहरण इंडोनेशियाचे

गॅट करारात निर्धारित आयात कोटा एकूण वापराच्या तीन टक्के असावा असे एक कलम आहे.

इंडोनेशियामध्ये तांदुळाचा वार्षिक वापर २५ दशलक्ष टन आहे. त्याच्या तीन टक्के आयात काराराची तर ती ७५,००० टनाची होईल. भाताच्या बाबतीत १९७४ पासूनच स्वयंपूर्ण झालेल्या या देशाच्या सरकारला इतकी आयात केली तर आपल्या शेतकऱ्यांवर विपरित परिणाम होईल असे वाटले म्हणून सरकारने इतका मोठा आयात कोटा आपणास अमान्य असल्याचे गॅटच्या सचिवालयास कळविले. गॅट सचिवालय व इंडोनेशिया सरकारचे प्रतिनिधी यांच्या चर्चेअंती गॅटने 'देशाला तशी गरज असेलच तर आणि दरसाल जास्तीत जास्त ७०,००० टन तांदूळ आयात करण्यास' इंडोनेशियाला हिरवा सिग्नल दिला आहे.

तांदुळाच्या बाबतीत १९७४ सालीच स्वयंपूर्ण झालेला इंडोनेशिया आतापर्यंत तांदूळ आयात करीतच होता. गेल्यावर्षी इंडोनेशियाची तांदुळाची आयात १,४०,००० टन म्हणजे गॅटने मान्यता दिलेल्या कोट्याच्या दुप्पट होती.

आता इंडोनेशियाच्या अन्नमंत्र्यांनी हेही स्पष्ट केले आहे की, देशातील तांदूळ मध्यम प्रतीचा आहे, यापुढे तांदुळाची जी काही आयात होईल ती त्याहून चांगल्या प्रतीच्या तांदुळाची असेल. मतितार्थ, असा की देशातील तांदुळाची किंमत पाडण्यासाठी तो वापरला जाणार नाही.

●●●

# साखर साम्राज्यात धरणीकंप

**– शरद जोशी**

सर्वदूर असा पक्का समज आहे की ग्रामीण महाराष्ट्राचे नांव दुमदुमते ते साखर कारखानदारीमुळे. सहकार क्षेत्रातील साखर कारखानदारीच्या विकासामुळे यच्चयावत् महाराष्ट्रातील ऊसशेतकरी सुखी आणि संपन्न झाला आहे. एवढेच नव्हे तर तो धनदांडगा झाला आहे. त्याने राजकारणावर प्रभुत्व स्थापन केले आहे; यशवंतराव चव्हाणांपासून ते वसंतदादा ते शरद पवार हे सगळे दिग्गज पुढारी महाराष्ट्रातील साखर लॉबीचे प्रतिनिधी म्हणजेच ऊसशेतकऱ्यांचे नेते इत्यादी इत्यादी. अशा अनेक गैरसमजुती देशभर पसरवलेल्या आहेत. ऊस-शेतकरी म्हणजे धनदांडगा पुढारी. सत्ता गाजवणारा, आपापल्या परिसरात सुलतानी चालवणारा, लक्षभोजने घालणारा अशी प्रतिमा तयार झाल्याने ऊस-शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे.

**मुंबई उच्चन्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाच्या एका निर्णयाने उसाची विक्री, साखरेची कारखानदारी आणि सर्वच सहकार क्षेत्र यांत हाहाकार उडाला आहे. न्यायालयाचा निर्णय रद्द करून घेण्यासाठी सारी पुढारी मंडळी कंबर कसून कामाला लागली आहेत. शेतकरी समाज मात्र या निर्णयाबद्दल उदासीन आहे. खंडपीठाच्या निर्णयाला धक्का लागू नये यासाठी शेतकऱ्यांना तनमनधनाने प्रयत्नांची पराकाष्ठा करावयासा पाहिजे**

**हे काय प्रकरण आहे?**

**ऊस : राजकारणाचे साधन**

प्रत्यक्षात परिस्थिती अगदी उलटी आहे. साखर कारखान्यांतून फोफावलेल्या नेतृत्वाने सर्वसाधारण ऊस-शेतकऱ्यांचे काहीही कल्याण केले नाही. साखरेवरील लेव्ही, लेव्ही साखरेची किंमत, साखर क्षेत्रावरील नियंत्रणे, मळीवरील बंधने, सारे सारे त्यांनी मुकाटपणे स्वीकारले आणि शेतकऱ्यांच्या गळी उतरवले. ऊसउत्पादक शेतकरी कर्जात बुडत गेला तरी त्याच्या ऊसाला योग्य किंमत मिळावी असा काही प्रयत्न पुढाऱ्यांनी केला नाही. सहकाराचा झेंडा फडकवून सत्ताधारी पक्षाच्या कोण्या म्होरक्यास साखर कारखाना काढण्याची परवानगी द्यावी, सरकारी तिजोरीतील कोट्यावधी रुपये त्याच्या पदरी टाकावे, त्या म्होरक्यानेही सदस्य शेतकऱ्यांचे काय कपाळ फुटते आहे तिकडे लक्ष न देता कारखान्यात भरमसाठ नोकरभरती करावी, आपल्या पित्त्यांना आणि चमच्यांना कंत्राटे द्यावीत, आणि कारखाना हडप करण्याची आपली सत्ता निरंकुशपणे चालवावी हा प्रकार वर्षानुवर्षे चालला आहे.

ऊस असो वा नसो, कारखाना हवा या आग्रहापोटी असे कारखाने तयार झाले की जे उसाला उणे भावच देऊ शकतात. शासनाने ठरवलेला उसाचा किमान भाव देता यावा याकरिता कारखान्यांना कर्ज काढावे लागते, कर्जाच्या आणि व्याजाच्या बोजापोटी पुढील वर्षी निघणारा भाव अधिकच खालावतो, पडत्या भावाचे हे दुष्टचक्र चालू राहते.

उत्तरेतील पंजाब, हरियाणा, उत्तर प्रदेश या राज्यांत नऊदहा टक्के शर्करांशाच्या उसाला सरसकट ७२० ते ७४० रुपये प्रतीटन भाव मिळतो. तर सांगली कोल्हापूरकडील बारा-साडेबारा टक्के शर्करांश असलेल्या ऊसालाही ५७५ रुपयांच्यावर भाव दिला जाऊ नये असा आदेश महाराष्ट्र सरकारने काढला आणि दुर्दैवाची गोष्ट अशी की, ऊस-शेतकऱ्यांनीही निमूटपणे मान खाली घालून हा अन्याय सहन केला. सहकारी साखर कारखान्यांचे सारे अर्थकारणच असे विचित्र झाले आहे की, म्होरक्या शेतकऱ्यांना ऊसाच्या भावापेक्षा सहकारातील आणि राजकारणातील लूटमारीची चट लागली आहे.

दहाबारा कारखान्यांचा अपवाद सोडला तर सगळे कारखाने तोट्यात आहेत. पण म्हणून काय झाले? त्या कारखान्यांवर आपली सत्ता अबाधित राखण्याकरिता हमरीतुमरी चालूच असते. विद्यमान कारखान्यांना पुरेसा ऊस नाही पण अजून दहावीस कारखाने काढण्याकरिता मुख्यमंत्र्यांची धावपळ चालूच आहे.

प्रत्येक कारखान्याचे एक कार्यक्षेत्र ठरलेले असते. त्या कार्यक्षेत्रातील ऊस-शेतकऱ्यांना आपला ऊस संबंधित कारखान्यासच घालण्याची सक्ती आहे. त्या कारखान्याला ऊस न देता गुळाचे गुऱ्हाळ घालण्याचीही परवानगी नाही. पण कार्यक्षेत्रात असलेल्या शेतकऱ्यांना कारखान्याचे सदस्यत्व आणि त्यांचा ऊस गाळला जाण्याची हमी मिळेल याची काही खात्री नाही. प्रत्येक कारखान्याच्या क्षेत्रात हजारो ऊसउत्पादकांना सदस्य बनू दिले जात नाही, कारण त्यांना सदस्य बनवले तर सत्ताधारी संचालक मंडळाची खुर्ची डळमळीत होण्याचा धोका आहे.

उसाच्या या प्रश्नावर १९८० सालापासून आंदोलने झाली. जागतिक बाजारभावाच्या तुलनेने आपल्या देशातील उसाचे भाव थोडेफार वरचढच आहेत. जगभर उसाचे उत्पादन आकाशातून पडणाऱ्या पाण्यावर होते. आपल्याकडील उसाचे उत्पादन प्रामुख्याने कालव्याच्या आणि उपसासिंचन योजनांच्या पाण्यावर होते. त्यामुळे आपल्याकडे उसाचा उत्पादनखर्च इतर देशांच्या तुलनेने जास्त राहतो. देशाची भौगोलिक, नैसर्गिक परिस्थिती, उत्पादनाची कार्यक्षमता आणि गिऱ्हाईकाचे हित पाहिले तर पाण्याची टंचाई असलेल्या या देशात, विशेषतः महाराष्ट्रासारख्या कोरडवाहू भूमीत मिळणाऱ्या थोड्याफार पाण्याचा उपयोग ऊस पिकवण्याकरिता व्हावा हे मोठे विचित्र आहे. अर्थकारणाने नाही तर राजकारणाने उसाचे

आणि साखरेचे साम्राज्य वाढत गेले.

**अर्थकारणाचे पारडे जड**

पण शेवटी अर्थकारण राजकारणावर मात करतेच. ऊस-शेतकऱ्यांनी संघर्ष करण्याची हिम्मत दाखवली नाही पण एक वेगळ्या मार्गाने साखर सम्राटांविरुद्धचा आपला रोष व्यक्त करण्यास सुरुवात केली. उसाच्या ऐवजी निलिगरी, फळबागा, विशेषतः द्राक्षे पिकवण्याकडे शेतकरी झपाट्याने वळत आहेत आणि साखरकारखान्यांची स्थिती अधिकाधिक डबघाईस येत आहे. पाऊसमान चांगले असूनही कारखान्यांना ऊस नाही या कारणाने डझनभर कारखाने यंदा बंदच राहिले आहेत. चालू राहणारे कारखाने यंदा मर्यादित काळच चालतील आणि तेवढे चालण्यासाठी देखील दुसऱ्या कारखान्याच्या कार्यक्षेत्रात जाऊन ऊसाची पळवापळवी करावी लागेल हे स्पष्ट आहे.

कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील बिगरसदस्यांच्या उसाचा प्रश्न किती मोठा अटीतटीचा बनला आहे. ज्या शेतकऱ्यांना सदस्य म्हणून मानायला कारखाना तयार नव्हता त्यांनी ऊस मात्र आपल्या कारखान्यासच घातला पाहिजे असा कार्यक्षेत्रातील कारखान्यांचा आग्रह. बिगरसदस्य शेतकरी साहजिकच आपल्या मालाला जास्त भाव मिळावा याकरिता प्रयत्न करणार. कार्यक्षेत्रातील कारखान्याबद्दल कोणत्याही प्रकारची निष्ठा बाळगण्याचे त्यांना काहीच कारण नाही. शेजारच्या कारखान्याला ऊस घालण्याकरिता काही विशेष धडपड करण्याचीही आता जरूरी राहिली नाही. शेजारचे कारखाने नोटा फडफडवीत यंदा चौफेर फिरत होते आणि सातेश रुपयांच्यावर भाव देऊन ऊस शेतकऱ्यांची मनधरणी करीत खरेदी करत होते.

**शेतकरी वाघांची लढाई**

शेतकरी संघटनेने औरंगाबाद अधिवेशनांत सदस्य आणि बिगरसदस्य शेतकऱ्यांनी जिथे चांगला भाव मिळेल तेथे ऊस द्यावा असा सल्लावजा आदेश दिल्याने परिस्थिती अधिकच स्फोटक बनली. एका कार्यक्षेत्रातून दुसऱ्या कार्यक्षेत्रात झोनबंदी तोडून जाणारा ऊस थांबवण्याकरिता कारखानदार धावपळ करू लागले. पोलिस अधिकाऱ्यांना खूष करून त्यांच्यामार्फत आवश्यक तर शेतकऱ्यांना मारहाण करून उसाचे ट्रक रोखू लागले.

# शेतकरी विरुद्ध साखरसम्राट दावा

**उसाला विक्रीस्वातंत्र्य नाही**

जळगाव जिल्ह्यातील पिंपळवड म्हाळसा आणि पिंप्री येथील १८ शेतकऱ्यांनी महाराष्ट्र शासन, साखर संचालक पुणे, प्रादेशिक सहकारी साखर संचालक, औरंगाबाद, तसेच बेलगंगा व कोपरगांव येथील साखर कारखान्यांवर दावा दाखल केला. सर्व अर्जदार शेतकरी बेलगंगा कारखान्याच्या कार्यक्षेत्रात ऊस पिकवतात पण त्यापैकी कोणीही बेलगंगा कारखान्याचे सदस्य नाहीत. बेलगंगा कारखाना ३६० रुपये प्रतिटनापेक्षा जास्त भाव देण्याची शक्यता नसल्याने, अर्जदार त्यांच्या निवडीने कोणत्याही दुसऱ्या कारखान्यास ऊस घालू इच्छित होते. त्यात कारखाने आणि शासन आड येत होते.

**सुप्रीम कोर्टाचा अंतरिम आदेश**

अशीच काही प्रकरणे सुप्रीम कोर्टापुढे विचाराधीन होती. ३ जानेवारी १९९४ रोजी सुप्रीम कोर्टाने आदेश दिला की, विवादित ऊस यंदाच्या हंगामात गाळायचा असल्यामुळे हायकोर्टाने दोन आठवड्याच्या कालावधीत या प्रकरणांचा निकाल लावावा. हायकोर्टाचा निर्णय येईपर्यंत तात्पुरती व्यवस्था म्हणून उसाची किंमत ७४० रुपये यंदाच्या हंगामापुरती धरण्यात यावी. कारखान्यांनी त्यापैकी प्रतीटन ६०० रुपये शेतकऱ्यांना उसाच्या गाळपाच्या वेळी द्यावी व १४० रुपये साखर संचालकांकडे बँक गॅरेंटीच्या रूपाने ठेवावेत असाही आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिला.

कारखाना ३६० ते ४१० रुपये एवढाच भाव शेतकऱ्यांना गाळपाच्या वेळी देऊ शकतो आणि अंतिम किंमत महाराष्ट्र शासनाच्या निर्णयानुसार ठरेल, असे कारखान्याच्या वतीने सांगण्यात आले.

**सर्वदूर ७४० रुपये प्रतीटन भाव**

औरंगाबाद खंडपीठाने समोर आलेल्या सर्व माहितीचा विचार करून प्रतीटन ७४० रुपये हाच योग्य बाजारभाव आहे असे ठरवले. गाळप करणाऱ्या कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील बिगरसदस्य सभासदांच्या उसाला ७४० रुपये भाव मिळाला पाहिजे. त्यापैकी ६०० रुपये गाळपानंतर १५ दिवसांच्या आत शेतकऱ्यांना मिळाले पाहिजेत, आणि १४० रुपयांची बँक गॅरेंटी साखर संचालक, महाराष्ट्र राज्य यांचेकडे ठेवली गेली पाहिजे असा निर्णय खडपीठाने दिला.

यंदा बंद पडलेल्या कारखान्यांच्या कार्यक्षेत्रातील उसाला देण्याच्या किमतीचाही खंडपीठाने विचार केला. सरकारमार्फत सांगण्यात आले की, अशा उसासाठी ५०० रुपये प्रतीटन किंमत देण्याचे जाहिर झाले असले तरी, त्यातील १४० रुपये बँक गॅरेंटीच्या स्वरूपात द्यायचे असल्याने ऊस उत्पादकांना किंमत म्हणून फक्त ३६० रुपयेच मिळायचे होते. यंदा बंद पडलेल्या कारखान्यांना पुढील वर्षी गाळप सुरू करण्याच्या दृष्टीने काही खर्च करावा लागेल हे खरे, पण त्यासंबंधीची व्यवस्था ठरवतांना झालेल्या चर्चेत फक्त कारखान्यांच्या संचालकांनी भाग घेतला; ऊसउत्पादकांचा विचार घेतला गेला नाही.

या सर्व गोष्टींचा विचार करून कोर्टाने बंद पडलेल्या कारखान्यांच्या कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यांच्या उसालाही ७४० रुपये भाव मिळाला पाहिजे असा निर्णय दिला.

**दडपशाहांना कडक इशारा**

या पलीकडे जाऊन औरंगाबाद खंडपीठाने आपल्या निकालपत्रात, शेतकऱ्यांचा ऊस रोकण्या-करिता पोलिसांनी केलेल्या अरेरावीचा आणि दडपशाहीचा कडक शब्दात समाचार घेतला आहे.

या निर्णयाने सगळे साखर सम्राट हादरून गेले आहेत. कोणत्याही मार्गाने हा निर्णय बदलून घेण्याचे त्यांचे प्रयत्न सुरू झाले आहेत. शेतकऱ्यांची अशी समजूत झाली आहे की, उद्या न्यायालयाचा हा निर्णय सर्व साखर कारखान्यांना आपोआप लागू होईल. ही समजूत खरी नाही. निर्णयाची सार्वत्रिक अंमलबजावणी व्हावी आणि झोनव्यवस्थेसंबंधीचा आदेश रद्द होऊन शेतकऱ्यांना न्याय मिळावा यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

पकडलेला ऊस पोलिसांच्या ताब्यात वाळून जाऊ लागला. ऊसाच्या राजकारणात आज अशी बेबंदशाही चालू आहे.

अशा परिस्थितीत कधी नव्हे तो एक चमत्कार घडला. जळगांव जिल्ह्यातील कांही शेतकरी कोर्टदरबारी गेले आणि २१ जानेवारी १९९४ रोजी औरंगाबाद खंडपीठाने दिलेला निर्णय शेतकऱ्यांच्या बाजूचा आहे. बिगर सदस्य शेतकऱ्यांनी कार्यक्षेत्रातील कारखान्यास ऊस घालावा अशी कारखान्याची इच्छा असेल तर त्यांच्या उसाला किमान ७४० रुपये प्रतीटन किंमत दिली पाहिजे असा हा निर्णय आहे. त्याविरुद्ध कारखाने आणि महाराष्ट्र सरकार सर्वोच्च न्यायालयात अपील घेऊन गेले आहेत.

त्याची पहिली सुनावणी शुक्रवार दिनांक १८ फेब्रुवारी १९९४ रोजी होणार आहे. ज्या शेतकऱ्यांनी आजपर्यंत हा प्रश्न लढवला त्यांचे अभिनंदन. परंतु, आपापला ऊस चांगल्या भावात खपला हे पाहताच हे शेतकरी इतके खूष झाले की आपले प्रकरण सुप्रीम कोर्टात लढवण्याची त्यांना इच्छा राहिली नाही.

सुप्रीम कोर्टात दावा लढवायचा म्हटल्यावर येणाऱ्या खर्चाच्या आकड्याने ते हबकले असतील. अगदी शेवटच्या क्षणी शेतकरी संघटना या कोर्टातील मामल्यात उतरण्याची तयारी करीत आहेत. पण हा मामला संघटनेच्या नव्हे तर शेतकऱ्यांच्या नांवाने लढवला गेला पाहिजे. सोबत खटल्याच्या विषयाची थोडक्यात माहिती दिलेली आहे. हे प्रकरण कोर्टात लढवण्यासाठी ऊस शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने पुढे आले पाहिजे.

**ज्या शेतकऱ्यांना या कार्यक्रमात सामील व्हायचे असेल त्यांनी निदान १००० रुपये खर्च करण्याची तयारी ठेवली पाहिजे. कोर्टातील या लढ्यात भाग घेण्याची ज्यांची इच्छा असेल त्या शेतकऱ्यांनी शेतकरी संघटनेच्या मध्यवर्ती कार्यालयाकडे 'शेतकरी संघटना' या नांवाने काढलेल्या एक हजार रुपयांच्या ड्राफ्टसकट आपले नाव पत्त्यासह कळवावे.**

**२१ मार्च १९९४**
**शेतकरी संघटक : आंदोलन विशेषांक**
**१ नोव्हेंबर १९९३ पासूनच्या आंदोलनांची माहिती, फोटो पाठवा.**

## शेतकरी महिला आघाडी – दारू दुकान बंदी आंदोलन

# वाठोडा शुक्लेश्वर येथील दारू दुकान जमीनदोस्त!

भातकुली तालुक्यातील वाठोडा शुक्लेश्वर येथे असलेले दारू दुकान बंद करण्याचा ठराव ग्रामसभेने पारित केल्यानंतर देखील बंद न झाल्याने, शेतकरी संघटनेच्या सुमारे ५००० वर कार्यकर्त्यांनी, सदरहू दुकान ७ फेब्रुवारी रोजी पूर्णपणे उध्वस्त केले. शेतकरी संघटनेच्या महिला आघाडीचा यात प्रामुख्याने पुढाकार होता.

शेतकरी संघटना महिला आघाडीच्या अध्यक्षा सरोजताई काशीकर, माजी अध्यक्षा सुमनताई अग्रवाल, राजाभाऊ पाटील, जगन्नाथ बुरघाटे, घनश्याम पेंढे आणि शेतकरी संघटनेचे नेते किशोर माथनकर आदींच्या नेतृत्वाखाली, सभेनंतर सभास्थानावरून निघालेल्या मोर्चात सुमारे १५०० वर महिला कार्यकर्त्या सहभागी झाल्या होत्या.

गावातून फिरत हा मोर्चा देशी दारू दुकानाजवळ पोहोचल्यानंतर, दारू दुकानाचे कुलूप तोडून दरवाजा उघडण्यात आला व आतील सर्व बाटल्या बाहेर आणून फोडण्यात आल्या. इतकेच नव्हे तर दुकानाचे छत आणि भिंती देखील पाडण्यात आल्या. दारूचे दुकान इमारतीसह खोदून उध्वस्त करण्यात आल्याची महाराष्ट्रातील ही पहिलीच घटना होय.

गावामधील दारू दुकान बंद करण्याचा ठराव ग्रामसभेने केल्यानंतरही जर दुकान बंद करण्यात आले नाही तर ते उध्वस्त करण्याचे आंदोलन शेतकरी संघटनेतर्फे राबविण्यात येत असून या आंदोलनांतर्गत आज वाठोडा शुक्लेश्वर येथील हे दुकान उध्वस्त करण्यात आले.

### संघटना कार्यकर्त्यांची प्रतिज्ञा

ग्रामसभांनी ठराव केल्यानंतर देखील ज्या गावातील दारू दुकाने बंद करण्यात आलेली नसतील ती सर्व दुकाने येत्या १५ दिवसात बंद पाडण्याची प्रतिज्ञा यावेळी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी केली. *(दै. देशोन्नतीवरून)*

●●●

# जिल्हाधिकाऱ्यांनी दारू दुकाने बंद केली

शेतकरी महिला आघाडीच्या पुढाकाराने ग्रामसभांनी ठराव केल्याप्रमाणे चंद्रपूर जिल्ह्यातील करंजी (ता. गोंडपिंपरी) येथील दोन आणि मेंढकी (ता. गोंडपिंपरी) व चिमूर (ता. चिमूर) येथील प्रत्येकी एक दारू दुकान चंद्रपूर जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाने बंद झाली आहेत.

कोठारी (ता. चंद्रपूर) व टेंभुरवाई (ता. राजुरा) येथील दारू दुकानांची प्रकरणे सिव्हिल कोर्टात न्यायप्रविष्ठ झाली आहेत.

# निर्यातीसाठी जनता पक्षाची देखरेख पथके

नुकताच झालेला गॅटचा आंतरराष्ट्रीय व्यापार करार हा शेतकऱ्यांच्या हिताचा असल्याने शेतकऱ्यांना शेतीमालाची निर्यात विनाअडथळा करता यावी यासाठी जनता पक्षातर्फे जिल्हावार देखरेख पथके तयार केली जाणार असल्याचे त्या पक्षाचे अध्यक्ष डॉ. सुब्रमण्यमस्वामी यांनी बंगलोर येथे ७ फेब्रुवारी रोजी जाहिर केले. या देखरेख पथकांमध्ये काम करण्यासाठी आपले प्रतिनिधी नियुक्त करावेत असे डॉ. स्वामींनी देशातील विविध शेतकरी संघटनांना पत्राने कळविले आहे.

कापसाच्या निर्यातीवरील निर्बंध हे गॅट कराराचा भंग करणारे असल्याने ते सरकारने रद्द करावेत असे सांगून ही कारवाई १५ एप्रिल १९९४ पर्यंत न झाल्यास आपला पक्ष गॅटच्या ब्रुसेल्समधील सचिवालयात तक्रार करील असा इशाराही डॉ. स्वामींनी दिला. (दरम्यान अशा प्रकारची तक्रार गॅटच्या एखाद्या सभासद देशाने केली पाहिजे असे गॅटचे उपमहासचिव श्री. अन्वर होडा यांनी सांगितल्याचे समजते.)

भारतातील शेतीक्षेत्रास भरभराटीची संधी उपलब्ध करून देणाऱ्या गॅट कराराला विरोध करणाऱ्यांचा खरपूस समाचार घेताना डॉ. स्वामी म्हणाले की, हे विरोधक एकतर अज्ञानी असावेत नाहीतर खोड्याळ किंवा डावे असावेत. गॅट करारावर सही केल्यामुळे अपराधीपणाच्या भावनेत राहाणाऱ्या काँग्रेस शासनावरही त्यांनी त्यासाठी टीका केली.

*(इकॉनॉमिक टाईम्स ८ फेब्रुवारी १९९४ वरून)*

# ककोपूस-शेतककेरी वाघ बनले पोलिस गणवेषातील गुंड झाले

'माल आमचा, मालक आम्ही' म्हणत खुल्या बाजार व्यवस्थेच्या शोधात सक्रीय असलेल्या कापूस उत्पादक शेतकऱ्यांवर महाराष्ट्र शासनाच्या पोलिसांनी दडपशाहीचा वरवंटा फिरविण्याचा चंग बांधलेला दिसतो आहे.

कोणाकडेही परवानगीची भीक न मागता कापसाची खरेदी विक्री करणे, कापूस सीमापार करणे, कापसाचा रेचा टाकणे इत्यादी मार्गांनी गेले दोन महिने अकोला, अमरावती, बुलढाणा जिल्ह्यातील कापूस उत्पादक शेतकरी आंदोलन करीत आहेत. आंदोलकांवरील पोलिसी दडपशाही वाढू लागली आहे.

बुलढाण्याजवळ पोलिसांनी केलेल्या निर्घृण लाठीहल्ल्यातून महिलाही सुटू शकल्या नाहीत. त्यामुळे आंदोलन प्रखर व व्यापक करण्याचा निर्णय घेण्यात येऊन अकोला येथे 'खुली कापूस मंडी व सीमापार आंदोलन' ९ फेब्रुवारी १९९४ रोजी आयोजित करण्यात आले. बुलढाण्याजवळ पोलिसांनी केलेली दडपशाही लक्षात घेऊन स्वतः शरद जोशींनी या आंदोलनात हजर राहाण्याचे ठरवले व तसे जाहिर केले. तीनही जिल्ह्यात आंदोलनाची तयारी झाली.

महाराष्ट्र शासनाच्या पोलिसांनी १९८६ च्या कापूस आंदोलनातील 'कर्तबगारी'ची पुनरावृत्ती केली. तीनही जिल्ह्यांत गावोगाव जाऊन प्रमुख कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले. १९८६ च्या पोलिसी कारवाईत आणि आताच्या कारवाईत एक ठळक फरक होता. त्यावेळचा सर्व सभ्यपणा, कायदेशीरपणा पोलिस खात्याने आता सोडून दिला आहे. कार्यकर्त्यांना शिवीगाळ करीत, मारझोड, धक्काबुक्की करीत अटक केली जाते, महिला कार्यकर्त्यांच्या संदर्भात आखून दिलेल्या नियमांचे पालन करण्याचा विचारही सुटलेला दिसतो.

आदल्या दोन दिवसांच्या अशा गुंड दडपशाहीच्या दर्शनानंतरसुद्धा असंख्य शेतकरी अकोल्याला येणार असे लक्षात येताच पोलिसांनी सर्व नाक्यांवर पहारे बसवले आणि अकोल्याकडे निघालेल्या सर्व शेतकऱ्यांना त्यांच्या वाहनांसह अडकवून ठेवले. इतर मार्गांनी अकोल्यात पोहोचणाऱ्या प्रत्येक माणसाची तपासणी होऊ लागली. बिल्लाधारी तर सुटतच नव्हता, पण इतरही नागरिकांना पोलिसांनी विनाकारण अटक केली. अनेक कार्यकर्ते भूमिगत झाले. त्यांना शोधण्यासाठी पोलिसांनी अकोल्यातील निशात टॉवर्सची झडती घेऊन तेथे मुक्कामाला असलेल्या ३०/३५ कार्यकर्त्यांना अटक केली. याच इमारतीत असलेल्या एका दवाखान्यामधील पेशंटच्या नातेवाईकांनाही त्यांच्याबरोबर अटक केली.

पोलिस यंत्रणेला यशस्वी हुलकावणी देऊन ९ फेब्रुवारी रोजी सकाळी भूमिगत कार्यकर्ते शरद जोशींच्या वार्ताहर परिषदेत श्री. प्रकाश पोहरे यांच्या निवासस्थानी हजर झाले.

शासन व नोकरशाहीच्या पाशात अडकलेल्या एकाधिकाराची कोंडी फोडण्यासाठी संघटनेने पुकारलेले आंदोलन दडपण्यासाठी पोलिसांतर्फे दाखविण्यात आलेली तत्परता व कार्यक्षमता गुन्हेगारीला आळा घालण्याकामी दाखविली असती तर महाराष्ट्रचे वाटोळे होण्याची वेळ आली नसती असे श्री. शरद जोशींनी वार्ताहर परिषदेत सांगितले.

वार्ताहर परिषदेनंतर तेथेच एका ट्रकवर बसविलेल्या कापूस रेच्याचे बटन दाबून श्री. शरद जोशींनी या 'खुली कापूस मंडी व सीमापार' आंदोलनाचा आरंभ केला. लगेच त्यांच्या नेतृत्वाखाली दीडेकशे कार्यकर्ते घोषणा देत खुल्या कापूस मंडीच्या नियोजित मैदानाकडे निघाले. (या मैदानाचा संपूर्ण ताबा दोन दिवसापासूनच पोलिसांनी घेतला होता.) शंभरएक फूट अंतर चालून जाईपर्यंत पोलिसांनी कार्यकर्त्यांची धरपकड, धक्काबुक्की सुरू केली. पुढे चक्क मारहाण सुरू केली. श्री. शरद जोशींनी पोलिस, कार्यकर्त्यांना देत असलेल्या या वागणुकीबद्दल शहर पोलिस अधिक्षकांकडे तीव्र शब्दांत नापसंती व्यक्त केली.

पोलिसांनी श्री. शरद जोशींसह सर्वांना अटक केली व पोलिस व्हॅनमध्ये कोंबले. त्यावेळी शरद जोशींसोबत शेतकरी महिला आघाडीच्या अध्यक्षा आमदार सौ. सरोज काशीकर, आमदार वामनराव चटप, विजय सारभुकन व या कापूस आंदोलनाचे सेनापती श्री. प्रकाश पोहरे यांचा समावेश होता. सर्वांची सायंकाळी सुटका करण्यात आली.

१० फेब्रुवारी सकाळी ११ वाजता निंबा येथून कापूस रॅली सुरू झाली. रॅलीत ४०० ते ५०० वाहने व अडीचतीन हजार शेतकरी होते. नेतृत्व होते प्रकाश पोहरे व रावसाहेब कांबे यांच्याकडे. एकूण संख्या पाहून निंबा येथील पोलिसांनी नमते धोरण स्वीकारून फक्त वाहनांचे नंबर टिपून घेतले, रॅली हिवरखेड मार्गे बऱ्हाणपूरकडे निघाली.

सीमेवरही पोलिसांनी हेच धोरण अवलंबिले. दीडदोनशे वाहने पुढे गेली. बाकीची मागाहून येत होती. रात्रीची वेळ होती. धारणीच्या जंगलात मागे राहिलेल्या वाहनांना पोलिसांनी बरतांडा येथे अडवले व प्रत्येक वाहनामागे पाच हजार रुपये दिले तरच सोडू असे सांगितले. सोबतचे शेतकरी संतापले, तरी पोलिसांचा खाक्या तोच. तेवढ्यात पोलिसांनी रॅलीतील शेतकऱ्यांवर व्हॅनमधून अकारण गोळीबार केला.

काही कार्यकर्त्यांना चौकीत नेऊन बंदुकीच्या दस्त्याने मारहाण केली. श्री. घनश्याम भट्टड यांच्या उजव्या दंडाला गोळी लागून ते जखमी झाले. त्यांना कार्यकर्त्यांनी त्वरित दवाखान्यात दाखल केले. गोळीबाराची बातमी कळताच बऱ्हाणपूरला पोहोचलेले प्रमुख कार्यकर्ते बरतांड्याला आले.

९/१० फेब्रुवारीला पोलिसांनी केलेल्या दडपशाहीचा सर्वत्र तीव्र निषेध करण्यात येऊन हे आंदोलन अधिक तीव्र करण्याचा निर्धार करण्यात आला.

आंदोलनाचा यापुढील टप्पा २५ फेब्रुवारी रोजी अमरावती-मोर्शी- वरूड-पांढुर्णामार्गे मध्यप्रदेशात जाणाऱ्या कापूस रॅलीने सुरू होईल. ही रॅली पांढुर्ण्यापर्यंत वाहनाने तर त्यापुढे पायी जाणार असून तिचे नेतृत्व स्वतः शरद जोशी करणार आहेत.

●●●

Posted at Market Yard, PSO, Pune 37.
On 21st February, 1994

To

SHETKARI SANGHATAK
(Marathi Fortnightly)
Regd. No. 39926/83
February 21, 1994

PNCW 281
Licence to post without prepayment
No. 87

## जागतिक कापूसव्यापार क्षेत्रात इंडिया काळ्या यादीत

''देशातील कापूस निर्यातदारांनी गेल्या २० वर्षांच्या परिश्रमाने जागतिक कापूसनिर्यात क्षेत्राच्या आघाडीवर आणले होते, त्यावर इंडिया सरकारने एका फटक्यासरशी पाणी फिरवले.'' लिव्हरपूर मुख्यालय असलेल्या रॅली ब्रदर्स अँड कोनी या जगातील मोठ्या व्यापारी संस्थेच्या प्रवक्त्याची ही प्रतिक्रिया आहे इंडिया शासनाने मागील पंधरवड्यात कापूस निर्यातीसंबंधी काढलेल्या, करारभंग करणाऱ्या आदेशावर

इंडिया शासनाने निर्यातीसाठी खुल्या केलेल्या कापसाच्या ५ लाख गाठींपैकी करार न झालेल्या १.३ लाख गाठींच्या निर्यातीस बंदी तर घातलीच, पण करार झालेल्या कापसाचीसुद्धा निर्यात रोखून धरली.

दिलेला शब्द बदलण्याच्या इंडिया शासनाच्या या कृतीमुळे युरोप व जपानमधील कापूसव्यापार क्षेत्रातील बहुराष्ट्रीय कंपन्या इंडियाला 'काळ्या यादी'त घालण्याचा विचार करीत आहेत. इतकेच नव्हे तर, करार झालेल्या कापसाची निर्यातीवरील बंदी उठविली नाही तर या कंपन्या सुमारे ४० कोटी रुपये नुकसान भरपाई वसूल करणार आहेत. अशी वसुली झाली तर तिचा फटका प्रामुख्याने राष्ट्रीय कापूस महामंडळ, महाराष्ट्र, पंजाब, हरियाणा, राजस्थान, गुजरात या राज्यांतील कापूस पणन महामंडळे, पंजाब स्पिनफेड, नाफेड आणि अगदी आंध्र प्रदेशातील गिरिजन सोसायटीलाही बसणार आहे.

जिनिव्हातील ACME या कापूस व्यापाऱ्यांच्या संघटनेने इंडियाच्या वस्त्रोद्योग मंत्रालयाला कळविले आहे की तुमचे हे अकस्मात कृत्य बिलकुल खपवून घेतले जाणार नाही. वस्त्रोद्योग मंत्रालयाचा हा निर्णय कापसाच्या जागतिक व्यापार क्षेत्रात कसा अंदाधुंदी माजविणारा आहे, त्यामुळे देशाचे नांव कसे बदनाम होऊ लागले आहे हे ACME चे अध्यक्ष श्री. ॲलर्ट गेहरेल मंत्रालयाला कळवितांना लिहितात,

"I would like to remind your Excellency (Textile Minister), that the cotton contracted with the various state authorities, the Cotton Corporation of India and private trade has been sold to textile mills around the world. We must, therefore, draw your attention to the devastating repercussions of this measure to the reputation of your country's reliability as an exporter of agricultural goods in general and cotton in particular."

श्री. ॲलर्ट साहेबाने दिलेल्या इशाऱ्याचा सरळसरळ अर्थ असा की कापसाच्या निर्यातबंदीबाबत इंडिया शासनाने आपला निर्णय त्वरीत मागे घेतला नाही तर, संपूर्ण जग भारतातील इतरही शेतीमालाचे 'ताक' फुंकूनच पिईल. म्हणजे कापूस निर्यातच नव्हे तर सर्व शेतीमालाच्या बाबतीत इंडिया 'काळ्या यादी'त जाणार आणि भारताच्या शेतकऱ्याच्या हातातोंडाशी आलेला घास दूर जाणार.

*(इकॉनॉमिक टाईम्स ११ फेब्रुवारी १९९४)*

## कापूस सीमापर आंदोलन पुढील टप्पा २५ फेब्रुवारी रोजी

अमरावती-मोर्शीमार्गे मध्य प्रदेशात रॅलीने जाऊन खुल्या बाजारात कापूस विक्री करण्याच्या या आंदोलनाचे वेळापत्रक.

**२५ फेब्रुवारी १९९४**

सकाळी १० वाजता अमरावतीच्या कॉटन मार्केट जवळ सर्व शेतकरी आपापल्या वाहनांसह जमतील.

१०-३० – शरद जोशींची जाहिर सभा

११-०० – अमरावतीहून वाहनांच्या रॅलीचे मोर्शीकडे प्रयाण

दुपारी १-०० – मोर्शी येथे रॅलीचे आगमन व जाहिर सभा, परस्पर मोर्शी येथे आलेल्या शेतकऱ्यांचा रॅलीमध्ये समावेश.

मोर्शीहून रॅलीचे वाहनांसह पांढुर्ण्याकडे प्रयाण. वाहने सीमेच्या अलिकडेच ठेवून शरद जोशी व इतर नेत्यांसह सर्व शेतकरी स्त्री- पुरुष सोबत आणलेले कापसाचे बाचके हाती घेऊन पदयात्रेने पांढुर्ण्याकडे कूच करतील. शेतकऱ्यांनी आणलेला सर्व कापूस एकत्रितपणे शेतकरी संघटनेच्या नांवाने पांढुर्णा येथील खुल्या बाजारात विकण्यात येईल. रॅली अमरावती येथून निघून लेहगाव, मोर्शी, वरूड मार्गे पांढुर्ण्याला जाईल. पांढुर्णा येथे मध्य प्रदेशातील शेतकरी व व्यापारी मोठ्या संख्येने रॅलीच्या स्वागतासाठी जमणार आहेत.

इतर जिल्ह्यातील ज्या शेतकऱ्यांना अमरावती येथे येणे जमणार नाही, त्यांनी या रॅलीमध्ये सहभागी होण्यासाठी मोर्शी येथे २५ फेब्रुवारी रोजी दुपारी १ वाजण्याच्या आत पोहोचावे. गणवेषातील गुंडांपासून सरंक्षणाच्या दृष्टीने सर्वांनी अमरावती ते मोर्शी या दरम्यानच रॅलीस मिळावे. येताना हातात धरून चालत जाता येईल इतक्या कापसाचे बाचके बरोबर घेऊन यावे.

६ व २१ तारखेला प्रसिद्ध होतो.
प्रकाशन स्थळ व पत्रव्यवहाराचा पत्ता
अंगारमळा, मु. पो. आंबेठाण (४१० ५०१)
ता. खेड, जि. पुणे.

संपादक, मुद्रक, प्रकाशक
सुरेशचंद्र म्हात्रे
फोन : द्वारा - चाकण ५२३५४/५२४६८
एस्.टी.डी.-०२१३५

पाक्षिक शेतकरी संघटक
मालक – मोहन बिहारीलाल परदेशी
मुद्रण स्थळ – गणेश प्रिंटर्स,
६९३, बुधवार पेठ, पुणे - २.